2019-20

30 copies.

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - IV October - December - 2019

PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | वैदर्भीय काव्यप्रवाहाचा स्वातंत्र्यपूर्व वामङ्यीन वारसा<br>**डॉ. जयश्री शास्त्री** | ८१-८६ |
| १६ | वैदर्भीय नव्वदोत्तरी मराठी कविता<br>**प्रा. डॉ. भूषण रामटेके** | ८७-९२ |
| १७ | विदर्भातील निवडक लेखिका<br>**डॉ. पद्मरेखा धनकर** | ९३-९७ |
| १८ | विदर्भातील आदिवासींची राजकिय व सामाजिक जागृती<br>**प्रा. डॉ. संजय गोरे** | ९८-१०२ |
| १९ | विदर्भातील आदिवासी कवितेतील मातृदर्शन<br>**डॉ. प्रवीण व. काळे** | १०३-१०६ |
| २० | वारकरी संप्रदाय आणि वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज<br>**राजेंद्र आ. मालेकर** | १०७-१११ |
| २१ | विदर्भाची दंडार<br>**डॉ. मधुकर व्ही. नंदनवार** | ११२-११६ |
| २२ | नक्षलवादी चळवळीचा प्रभाव आणि वैदर्भीय मराठी आदिवासी कादंबरी<br>**डॉ. विजय रैवतकर** | ११७-१२४ |
| २३ | वैदर्भीय साहित्यसमीक्षक : डॉ. आशा सावदेकर<br>**प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत** | १२५-१२९ |
| २४ | एक परिवर्तनवादी : वैदर्भीय संत गाडगेबाबा<br>**प्रा. डॉ. संतोष देठे** | १३०-१३४ |
| २५ | ‘वर्तमान’ कथासंग्रहाचे स्वरूप<br>**प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण** | १३५-१३७ |
| २६ | विदर्भातील मराठी वीरशैव साहित्य व साहित्यिक<br>**प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर** | १३८-१४२ |
| २७ | वैदर्भीय लोककला (डाहाका)<br>**प्रा. सतीश एस. कर्णासे** | १४३-१४७ |
| २८ | कवी अनिल : जीवन आणि काव्य<br>**डॉ. सुदर्शन दिवसे** | १४८-१५२ |




M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★Armori★
Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २२. नक्षलवादी चळवळीचा प्रभाव आणि वैदर्भीय मराठी आदिवासी कादंबरी

**डॉ. विजय रैवतकर**
सहायक प्राध्यापक, महात्मा गांधी कला, विज्ञान आणि स्व.न. प. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली.

## सारांश (Abstract)

मराठी आदिवासी कादंबरीत नक्षवादी चळवळीचे चित्रण अभावानेच आढळते. नक्षलवाद प्रभावित क्षेत्रात आदिवासींचे जनजीवन आणि त्यांचे भावविश्व अतिशय संवेदनशील अशा वळणावरचे आहे. त्यांच्या भावविश्वाचे चित्रण करण्याचा प्रयत्न आदिवासी कादंबरीत करण्यात आला तथापि नक्षलप्रभावित आदिवासींचे जीवन, त्यांचे भावविश्व अधिक गडद आणि सूक्ष्मपणे रेखाटण्यात आल्याचे दिसत नाही. आदिवासी कादंबरीतून नक्षलवादी चळवळीचे चित्रण होत असताना नक्षवादाच्या गंभीर समस्येची उत्तरे सापडत नाहीत, नक्षलवादाचा खरा चेहरा स्पष्ट होत नाही तथा नक्षलप्रभावित जीवनानुभवाला भिडण्याची कमतरता कादंबरीकारांत दिसून येते. आदिवासी कादंबरीकारांनी आदिवासींच्या एकूणच प्रश्नांची चर्चा त्यांच्या अनुभवविश्वातून केली आहे. आदिवासी कादंबरीकारांनी आपल्या अनुभवविश्वाला जे शब्दरूप दिले ते आदिवासींच्या सामाजिक—सांस्कृतिक समस्यांच्या आणि त्यांच्या उत्थानाच्या बांधीलकीतूनच. एकूणच आदिवासी समाजजीवनाविषयी असणारी सहानुभूती आणि या समाजांतर्गत असणाऱ्या समस्या याच्या शोधातून आदिवासी कादंबरीचा जन्म झाला. पिढ्यानूपिढ्या उपेक्षित असणाऱ्या जनसमूदायाला अस्मिता आणि ओळख प्राप्त करून देणे, ही प्रेरणा आदिवासी साहित्यनिर्मितीमागे आहे. एकूणच वैदर्भीय आदिवासी कादंबरी याच केंद्राभोवती फिरताना दिसते. आदिवासी सामाजातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक समस्यांचा निपटारा, शोषणापासून मुक्तता आणि मानवीय पातळीवरील समानता या परिमाणातून आदिवासी कादंबरी साकार झाली आहे.

## प्रस्तावना (Introduction)

मराठी आदिवासी कादंबरीचा प्रवाह समृद्ध असा प्रवाह आहे. आदिवासी कादंबरीतून आदिवासींच्या समस्यांचे चित्रण करण्यात आले तसेच त्यांच्या जीवनानुभवाला साकारण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे. आदिवासी कादंबरीची समीक्षादेखील आदिवासी समाज, संस्कृती आणि साहित्य या परिमाणातून झाल्याची दिसते तथापि नक्षलप्रभावित क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी जनसमूहाचे आणि नक्षलचळवळीच्या प्रभावाचे चित्रण कादंबरीतून कसे झाले आहे. कादंबरीकाराची या अतिसंवेदनशील विषयावरील सर्जनशील प्रतिक्रिया याचा शोध घेण्याचा प्रयत्न समीक्षकांनी अपवादाने केलेला दिसतो. या लेखाच्या निमित्ताने वैदर्भीय मराठी आदिवासी कादंबरीत नक्षलवादी प्रभावाचे चित्रण कसे करण्यात आले. त्यात प्रकट झालेला नक्षवाद, नक्षलवादाचे बदलते स्वरूप व आदिवासी जनजीवनावरील प्रभावाचे चित्रण कसे करण्यात आले याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli